प्रेस नोट दि.२०/०१/२०२३

**लोकसेवक १.श्री. ज्ञानोबा हणमंतराव करमले, वय ३५ वर्षे, पद तलाठी, नेमणुक– तहसील कार्यालय उदगीर, जि. लातूर, वर्ग–३, २. सौ.अलका ज्ञानोबा करमले व ३. श्री. हणमंतराव निवृत्ती करमले यांचे विरुध्द अपसंपदेचा गुन्हा दाखल**

श्री. ज्ञानोबा हणमंतराव करमले, वय ३५ वर्षे, पद तलाठी, नेमणुक– बोरगाव (बु)–कोदळी, उदगीर तहसील जि. लातूर, वर्ग–३ यांचेवर अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो लातुर यांचे मार्फतीने दि ३०/०८/२०२० रोजी सापळा कारवाई झाली आहे. त्या अनुषंगाने अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, लातुर यांचेकडुन आलोसे ज्ञानोबा करमले यांच्या मालमत्तेची उघड चौकशी करण्यात आलेली आहे. सदर उघड चौकशीअंती ज्ञानोबा करमले यांनी त्यांचे लोकसेवक पद धारण केलेल्या कालावधीत त्यांना प्राप्त उत्पन्नाच्या तुलनेत त्यांचे अधिक मालमत्ते बाबत ते समाधानकारक स्पष्टीकरण देवु शकले नाहीत. एकंदरीत परिक्षण कालावधी दरम्यान सज्जा अतनुर, घोणशी व माळहिप्परगा येथे कार्यरत असताना आलोसे यांनी त्यांचे कायदेशीर ज्ञात उत्पन्नाच्या तुलनेत ३४,७५,८८६/–रु. ९८.६५% ची अपसंपदा संपादीत केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची अपसंपदा संपादीत करण्यासाठी त्यांची पत्नी अलका करमले व वडील हणमंतराव करमले यांनी सदरची मालमत्ता आलोसे यांच्यावतीने स्वत: बाळगुन ज्ञानोबा करमले यांना अपप्रेरणा दिली व मालमत्ता हस्तगत करण्यास प्रोत्साहन देवुन सहकार्य केले. म्हणुन ज्ञानोबा हणमंतराव करमले, वय ३५ वर्षे, पद तलाठी, नेमणुक– तहसील कार्यालय उदगीर, वर्ग–३ त्यांची पत्नी सौ. आलका ज्ञानोबा करमले व वडील श्री. हणमंतराव निवृत्ती करमले यांचे विरुध्द भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, लातुर यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीप्रमाणे त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे जळकोट, जि. लातुर येथे गु.र.नं २१/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ कलम १३(१)(ई) सह१३(२), व भारतीय दंड संहिता चे कलम १०९ आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) कलम १३(१)(ब) सह १३(२), १२ अन्वये दि २०/०१/२०२३ रोजी डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड व श्री. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली दाखल झालेला आहे. लोकसेवक ज्ञानोबा करमले यांच्या घराची व कार्यालयाची झडती घेण्याची प्रक्रिया पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड तसेच पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, अन्वर मुजावर यांचे मार्फत घरझडती सुरु असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. लातुर हे करीत आहेत. तसेच सदर गुन्हयाचे तपास कामी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, अन्वर मुजावर, पोहेकॉ– रमाकांत चाटे, फारूख दामटे, भागवत कठारे, शाम गिरी, पोना संतोष गिरी, पोकॉ शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, दिपक कलवले, संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, मपोशि रूपाली भोसले, चापोना संतोष क्षीरसागर, पोह आलुरे हे सहकार्य करीत आहेत.

याव्दारे जनतेस आवाहन करण्यात येते की, कोणीही शासकिय/निमशासकीय लोकसेवकांने त्यांचे ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक मालमत्ता/बेनामी मालमत्ता संपादीत केले असल्याचे माहीती असल्यास संपादीत मालमत्तेच्या विवरणासह नांवी लेखी अर्ज लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर कार्यालयात किंवा पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांना पाठवावे किंवा खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधवा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९६२३९९९९४४ |
| २) | श्री. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९९२३४१७०७६ |
| ३) | श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९३०९३४८१८४ |
| ४) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ५) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ६) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ७) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| 8) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर